# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 21/09/2021 (मंगळवार)

(सकाळ)

---

### चोरी

1) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 19 कि.मी अंतरावरील मौजा मुर्ती येथे दि. 03/09/2021 चे 16.00 ते दि. 15/09/2021 चे 15.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– चंद्रकांत दामोदर फुकट वय 47 वर्ष रा. काटोल यांचे बीएसएनलचे खुले टावर मध्ये ठेवलेल्या अमर राजा कंपनीच्या 400 ए.एच.च्या 24 बॅट–या किंमत 40,000 /–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार भोजराज तांदुळकर मो.नं. 775883030 हे करीत आहे.

2) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावरील मौजा स्वामी विवेकानंद वार्ड रामटेक येथे दि. 10/09/2021 चे 22.00 ते दि. 11/09/2021 चे 07.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– मारोती आंदराव वाढंरे, वय 55 वर्ष, रा. लाल दिवानशाह दर्गा जवळ रामटेक, ह.मु. प्लाट नं. 36 साईकृपा सोसाईटी, नरेंद्र नगर जि.नागपुर याने आपल्या गोडावुनच्या बाजुस खाली जागेत लोखंडी तरापे (स्टिल प्लेट) ठेवलेले असता. त्यापैकी 90 नग लोखंडी तरापे (स्टिल प्लेट) असा एकुण किमती 60,000/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मनोहर राऊत मो क 9423628307हे करीत आहे.

### मोटरसायकल चोरी

पो.स्टे. मौदा :– दि. 20/09/2021 चे 10.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– विशाल अशोक शर्मा, वय 24 वर्ष, रा. लापका ता. मौदा जि. नागपुर यांची एमएच– 04/व्हायएम– 0251 क्रमांकाची मोटरसायकल बावनकुळे हार्डवेअर दुकानासमोरील सिमेंट रोड वडोदा ठेवुन ते कामाने गेले असता परत येउन पाहिले तर त्यांची मोटरसायकल तिथे दिसली नाही. फिर्यादीने शोध घेतला त्यादरम्यान काही गाई बैल चारनाऱ्या लोकांनी माहिती दिली की, एक इसम हा धक्का मारत त्यांची मोटरसायकल वडोदा कडे घेवुन जातांनी दिसला असे सांगीतले असता फिर्यादी हे धावत जात असता वडोदा येथील काही लोकांनी आरोपीला पकडुन ठेवले होते. त्या ठिकानी फिर्यादी यांनी जावुन पाहीले असता फिर्यादींची एमएच– 04/व्हायएम– 0251 क्रमांकाची मोटरसायकल किंमत 63,000/–रू. ची तिथे आढळली. आरोपी नामे– राजेश राजकुमार कोकडे, वय 21 वर्ष, रा. सेलु ता कामठी जि नागपुर याने फिर्यादीची मोटरसायकल चोरली असता तेथील लोकांच्या मदतीने पोलीस स्टेशन मौदा येथे माहिती दिली असता आरोपीला अटक करण्यात आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रविन्द्र बकाल मो.क. 9834549675 हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावरील मौजा बैलवाडा येथे दिनांक 20/09/2021 चे 14.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– देवाजी प्रभाकर जुमडे, वय 48 वर्ष, रा. बैलवाडा, वार्ड क्र. 02, तह. जि नागपुर हे त्यांचे बैल घेवुन खुल्या जागेत हिरवा चारा चारण्यासाठी बैलांना नेले असता आरोपी नामे– यादवराव कृष्णाजी जुमडे, वय 58 वर्ष, रा. बैलवाडा याने फिर्यादीस शिवीगाळ करून बैल येथे चारायचे नाही, असे म्हणुन धक्काबुक्की केली व तेथील गोटा हातात घेवुन फिर्यादीचे कपाळावर मारल्याने जखम होवुन रक्त निघाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नावेद खान मोनं 8888826076 हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. मौदा – दिनांक 18/09/2021 चे 11.00 वा. चे सुमारास पो.स्टे. मौदा हद्दीत फिर्यादीचे पत्नीची मोठे बहिनीची 14 वर्षीय अल्पवयीन मुलगी हिचे आई व वडील मरण पावल्याने ती फिर्यादीचे घरीच राहते व शिवनक्लास चे शिक्षण घेते. ती घरतील लोकांना असे सांगुन निघाली की, ''मी शिवनक्लॉस ला जात आहे'' व ती परत घरी आली नाही. तिला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार रविन्द्र बकाल 9834549675 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर